Impact Factor 5.307 (SJIF)

**RESEARCH HUB**

International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal

ISSN 2582-9173

# डॉ. बा. आं. म. विद्यापीठ, औरंगाबाद संलग्नित पारंपारिक अनुदानित नॅक मुल्यांकन प्राप्त महाविद्यालयीन ग्रंथालयातील माहिती सेवा : एक अभ्यास

**प्रा. गजमल अर्जुन बंडू**
ग्रंथपाल,
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,
मुखेड जि. लातूर
E-mail :arjunbg94@gmail.com

**डॉ. बालाजी एन. ढाकणे**
प्राचार्य,
कै.सौ. शेषाबाई सीताराम मुंढे महाविदयालय,
गंगाखेड जि. परभणी
E-mail :ssmac.gkd@reddifmail.com

---

**सार :** प्रस्तुत पेपरमध्ये संशोधकाने डॉ. बा. आं. म. विद्यापीठ, औरंगाबाद संलग्नित पारंपारिक अनुदानित नॅक मुल्यांकन प्राप्त महाविद्यालयीन ग्रंथालयातील माहिती सेवांचा आढावा घ्येण्यात आला आहे. तसेच लिंगनिहाय ग्रंथपालांची संख्या व नवीन सभासदांना उपभोक्ता प्रशिक्षण देण्यासाठी कोणकोणत्या पद्धतीचा अवलंब केला आहे याचा शोध घेण्यात आला आहे. आजच्या युगात ग्रंथालय म्हणजे ग्रंथांचा मोठा संग्रह नसून माहितीच्या उगम स्थानापासून तिच्या योग्य त्या उपयोजकापर्यंत तिचा प्रवास तत्परतेने व सहजरित्या कसा होईल या कार्यात मग्न राहणारी यंत्रणा म्हणजे ग्रंथालय होय. म्हणून आज ग्रंथालय सेवा हा शब्द प्रचलित नसून ग्रंथालय आणि माहिती सेवा हा शब्दप्रयोग सुरु झाला आहे. पुढील प्रमाणे माहिती सेवा, उपभोक्ता प्रशिक्षण व लिंगनिहाय संख्या यांचा आढावा पुढील प्रमाणे घेण्यात आला आहे.

**शोधसंज्ञा :** माहिती सेवा, उपभोक्ता प्रशिक्षण व ग्रंथालय.

---

**प्रस्तावना** :

आजच्या आधुनिक काळामध्ये माहितीची गरज प्रत्येक व्यक्तीला आहे. यात विद्यार्थी, वाचक, अभ्यासक, संशोधक व प्राध्यापक यांना माहितीची आवश्यकता असते. या दृष्टिकोनातून महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये पारंपारिक सेवांबरोबरच माहिती सेवा दिल्या जातात. यात संदर्भ सेवा, प्रचलित जागरूकता सेवा, निवडक माहिती प्रसारण सेवा, वृत्तपत्र कात्रण सेवा, निर्देश सेवा OPAC व ग्रंथ आरक्षण सेवा इ. सेवा दिल्या जातात. तसेच उपभोक्ता प्रशिक्षणासाठी ग्रंथालय सप्ताह, भाषणपद्धती, ग्रंथालय भेट, छापील पुस्तिका व गरजेप्रमाणे मार्गदर्शन इ. चा समावेश होतो.

**व्याख्या :**

"ग्रंथालायांकडून वाचकांच्या सर्वसामान्य वाचनविषयक गरजा लक्षात घेऊन ज्या वेगवेगळ्या सेवा ग्रंथालाय्न्कडून दिल्या जातात त्यास माहिती सेवा असे म्हणतात."

**उद्दिष्टे :**

१. डॉ.बा.आ.म.वि. संलग्नित महाविदयालयीन ग्रंथालयातील माहिती सेवांचा शोध घेणे.

२. उपभोक्ता प्रशिक्षणासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या पद्धतींचा आढावा घेणे.

**गृहीतके :**

१. डॉ.बा.आ.म.वि. संलग्नित महाविद्यालयीन ग्रंथालयातून विविध माहिती सेवा दिल्या जातात.

२. उपभोक्ता प्रशिक्षणासाठी विविध पद्धतींचा अवलंब केला जातो.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करणायत आला असून सर्वेक्षण/पाहणी या तंत्राचा अवलंब करण्यात आला आहे.

**माहिती संकलन :**

माहितीचे संकलन करण्यासाठी संशोधकाने प्रश्नावली व मुलाखत या साधनाचा उपयोग केला आहे. प्रश्नावलीद्वारे एकूण ८० नॅक मुल्यांकन प्राप्त महाविद्यालयांपैकी ७० महाविद्यालयीन ग्रंथालयांनी प्रश्नावली प्रतिसाद दिलेला आहे. ७० ग्रंथालायांकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**माहितीचे विश्लेषण :**

संकलित करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.


**सारणी क्र. १ : महाविद्यालयीन ग्रंथालयातून देण्यात येणाऱ्या माहिती सेवा**

| अ.क्र. | ग्रंथालयीन माहिती सेवा | औरंगाबाद विद्यापीठ | |
|---|---|---|---|
| | | संख्या | प्रमाण |
| १. | ऑनलाईन संदर्भ सेवा | ६० | ८५.७१% |
| २. | प्रचलित जागरूकता सेवा | ४२ | ६०.००% |
| ३. | निवडक माहिती प्रसारण सेवा | ५३ | ७५.७१% |
| ४. | वृत्तपत्र कात्रण सेवा | ७० | १००% |
| ५. | निर्देश सेवा | ३६ | ५१.४३% |
| ६. | सार स्वरूप सेवा | ७० | १००% |
| ७. | सोशल नेट्वर्किंग सेवा | २८ | ४०.००% |
| ८. | ऑनलाईन आंतरग्रंथालयीन सेवा | ५१ | ७२.८६% |
| ९. | बुक बँक सेवा | ५८ | ८२.८६% |

**आलेख क्र. १**

**महाविद्यालयीन ग्रंथालयातून देण्यात येणाऱ्या माहिती सेवेचा आलेख**

Research Hub International Journal




सारणी व आलेख क्र. १ वरून असे आढळून येते की, डॉ.बा.आ.म.वि. संलग्नित महाविदयालयीन ग्रंथालयातून विविध प्रकारच्या माहिती वाचकांना प्रदान केल्या जातात. यामध्ये वृत्तपत्र कात्रण सेवा व सार स्वरूप सेवा सर्वच ७० (१००%)ग्रंथालयातून दिली जाते. तसेच ऑनलाईन संदर्भ सेवा ६० (८५.७१%), बुक बँक सेवा ५८(८२.८६%), निवडक माहिती प्रसारण सेवा ५३(७५.७१%), ऑनलाईन आंतरग्रंथालयीन सेवा ५१ (७२.८६%) ग्रंथालयातून उपभोक्त्यांना दिली जात असल्याचे दिसून येते. तसेच प्रचलित जागरूकता सेवा ४२ (६०.००%), निर्देश सेवा ३६ (५१.४३%) व सोशल नेटवर्किंग सेवा २८ (४०.००%) महाविद्यालयीन ग्रंथालायामधून दिली जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

**सारणी क्र. २ : लिंगनिहाय ग्रंथपाल यांची संख्या दर्शवणारी सारणी**

| अ.क्र. | तपशील | औरंगाबाद विद्यापीठ | |
|---|---|---|---|
| | | संख्या | संख्या |
| १. | पुरुष ग्रंथपाल | ६० | ८५.७१ % |
| २. | स्त्री ग्रंथपाल | १० | १४.२९ % |
| | **एकूण** | ७० | **१०० %** |

सारणी क्र. २ वरून असे दिसून येते कि, डॉ.बा.आ.म.वि. संलग्नित महाविदयालयीन ग्रंथालयत पुरुष ग्रंथपाल यांची संख्या ६० (८५.७१%) आहे तर स्त्री ग्रंथपाल यांची संख्या १० (१४.२९%) आहे. एकूण माहितीवरून असा निष्कर्ष निघतो कि स्त्री ग्रंथपाल यांच्यापेक्षा पुरुष ग्रंथपालांचे प्रमाण अधिक आहे.

**सारणी क्र. ३ : लिंगनिहाय ग्रंथपाल यांची संख्या दर्शवणारी सारणी**

| अ.क्र. | तपशील | औरंगाबाद विद्यापीठ |
|---|---|---|

| | | **संख्या** | **संख्या** |
|---|---|---|---|
| १. | पुरुष ग्रंथपाल | ६० | ८५.७१ % |
| २. | स्त्री ग्रंथपाल | १० | १४.२९ % |
| | **एकूण** | **७०** | **१०० %** |

सारणी क्र. २ वरून असे दिसून येते कि, डॉ.बा.आ.म.वि. संलग्नित महाविदयालयीन ग्रंथालयात पुरुष ग्रंथपाल यांची संख्या ६० (८५.७१%) आहे तर स्त्री ग्रंथपाल यांची संख्या १० (१४.२९%) आहे. एकूण माहितीवरून असा निष्कर्ष निघतो कि स्त्री ग्रंथपाल यांच्यापेक्षा पुरुष ग्रंथपालांचे प्रमाण अधिक आहे.

**सारणी क्र. ३ : उपभोक्ता प्रशिक्षण पद्धतीची माहिती**

| **अ. क्र.** | **विद्यापीठ** | **प्रशिक्षण पद्धती** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्रंथालय सप्ताह | भाषण पद्धती | ग्रंथालय भेट | छापील पुस्तिका | गरजेप्रमाणे मार्गदर्शन |
| १. | डॉ.बा.आ.म.विद्यापीठ, औरंगाबाद | ५३ | १९ | ६६ | १४ | २८ |
| | **प्रमाण** | **७५.७१ %** | **२७.१४%** | **९४.२९%** | **२०.००%** | **४०.००%** |

वरील सारणीवरून असे लक्षात येते कि, डॉ.बा.आ.म.वि. संलग्नित महाविदयालयीन ग्रंथालयतून उपभोक्ता प्रशिक्षण देण्यासाठी विविध पद्धतींचा अवलंब केला जातो. यात ग्रंथालय भेट एकूण ७० महाविद्यालयीन ग्रंथालयापैकी ६६ (**९४.२९%**) ग्रंथालयात अवलंब केला जातो. ५३ (**७५.७१%**) ग्रंथालयांमध्ये ग्रंथालय सप्ताहचे आयोजन केले जाते. तसेच भाषण पद्धत, छापील पुस्तिका व गरजेप्रमाणे मार्गदर्शन अनुक्रमे १९ (**२७.१४%**), १४ (**२०.००%**) व २८ (**४०.००%**) ग्रंथालयातून या पद्धतीचा अवलंब केल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :**

१. वृत्तपत्र कात्रण सेवा व सार स्वरूप सेवा सर्वच ७० (१००%)ग्रंथालयातून दिली जाते.
२. प्रचलित जागरूकता सेवा ४२ (६०.००%), निर्देश सेवा ३६ (५१.४३%) व सोशल नेट्वर्किंग सेवा २८ (४०.००%) महाविद्यालयीन ग्रंथालायामधून दिली जाते.
३. पुरुष ग्रंथपाल यांची संख्या ६० (८५.७१%) आहे.
४. उपभोक्ता प्रशिक्षण देण्यासाठी ६६ (**९४.२९%**) ग्रंथालयात ग्रंथालय भेट या पद्धतीचा अवलंब केला जातो.
५. भाषण पद्धत, छापील पुस्तिका व गरजेप्रमाणे मार्गदर्शन अनुक्रमे १९ (**२७.१४%**), १४ (**२०.००%**) व २८ (**४०.००%**) ग्रंथालयातून दिले जाते.

**गृहीतक चाचणी :**

Research Hub International Journal

१. **गृहीतक क्र. १ साध्य झालेले आहे.** डॉ.बा.आ.म.वि. संलग्नित महाविद्यालयीन ग्रंथालयातून विविध माहिती सेवा दिल्या जातात. यात वृत्तपत्र कात्रण सेवा, सार स्वरूप सेवा, ऑनलाईन आंतरग्रंथालयीन सेवा, ऑनलाईन संदर्भ सेवा इ.सेवा दिल्या जातात.

२. **गृहीतक क्र. २ साध्य झालेले आहे.** उपभोक्ता प्रशिक्षणासाठी विविध पद्धतींचा डॉ.बा.आ.म.वि. संलग्नित महाविद्यालयीन ग्रंथालयातून अवलंब केला जातो. यात ग्रंथालय भेट, भाषण पद्धत, ग्रंथालय भेट यांचा समावेश आहे.

**संदर्भसूची :**


- **सूर्यवंशी, प्रताप (ऑगस्ट २००६) माहितीचे निवडक प्रसारण, परभणी : ग्रंथपरिवार, मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघाचे प्रकाशन.**
- Khanna, J.K. (1996) Handbook Of Library Information System And Services, Delhi : Beacon publication.
- www.vikaspedia.com
- www.wikipedia.com
- **www.bamu.ac.in**


Research Hub International Journal